न्यायालयीन प्रकरण/तात्काळ

क्र.पोमसं/१४/६६/१९६-परिपत्रक/२०८/२०१७ मुंबई, दि. १५/०४/२०१७

**विषय** :- शासनास प्रस्ताव / पत्रव्यवहार करतांना योग्य कार्यपध्दत अवलंबिण्याबाबत.

**************

**परिपत्रक :-**

शासनाचे असे निदर्शनास आले आहे की, भारतीय दंड विधान कलम २९५ व १५३ अन्वये दाखल झालेल्या गुन्हयांच्या बाबतीत मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यापूर्वी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता,१९७३ कलम १९६ (अ)अंतर्गत प्रस्ताव पोलीस प्रशासनाकडून शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात येतात. सदर प्रस्तावात बऱ्याच प्रमाणात त्रुटी आढळून येतात. या त्रुटींची पूर्तता विहीत कालावधीत होत नाही. परिणामी, सदर प्रकरणे बऱ्याच काळ प्रलंबित राहतात. या बाबी विचारात घेऊन शासनाने यापुढे सदर प्रस्तांवाची दि: १९/१०/२००५ च्या शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन परिपूर्ण छाननी करुन, प्रस्तावांमध्ये त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता घेऊन प्रस्ताव या कार्यालयाच्या मार्फतीने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास पाठविण्याबाबत कळविले आहे.

कार्यालयीन कार्यपध्दतीनुसार शासनास किंवा वरिष्ठ कार्यालयास पत्रव्यवहार करतांना घटकांनी त्यांच्या नियंत्रक अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास पत्रव्यवहार करणे क्रमप्राप्त / बंधनकारक आहे. शासनास किंवा वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव /अहवाल / अभिप्राय सादर करताना तो परिपूर्ण/ स्वयंस्पष्ट तसेच शासन परिपत्रक/शुध्दीपत्रकानुसार असल्याची खात्री करुन आवश्यक त्या कागदपत्रासह योग्य मार्फतीने त्यांचे अभिप्रायासह सादर करण्यात यावे, जेणेकरुन प्रकरणाचा निपटारा करण्याच्या प्रक्रियेत अनावश्यक विलंब टाळता येईल. याबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/१४/६६/फौसंप्र-१९७/२००२, दि. १५/०५/२००२ व क्र. पोमसं/१४/६६/वि.स.-मुल्ला व इतर, रायगड/१७२/२०१७, दि. ०७/०४/२०१७ अन्वये वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहे.

तरी खालील नमूद सर्व पोलीस घटक प्रमुखांना याद्वारे पुन्हा सूचना देण्यात येत आहे की, यापुढे भा.द.वि. कलम २९५ व १५३ अन्वये दाखल झालेल्या गुन्हयांच्या बाबतीत मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यापूर्वी फौजदारी दंड संहिता १९७३ कलम १९६(अ) अन्वये प्रस्ताव शासनाकडे थेट सादर न करता, ते संबंधित नियंत्रण प्राधिकारी व या कार्यालयामार्फत शासनास सादर केले जातील याबाबत दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना सक्त सूचना देण्यात यावी.

१३/४

**(प्रभात कुमार)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त.
सर्व अपर पोलीस महासंचालक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक.
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.

**प्रत :-**

पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहाय्यक (गुन्हे), म.रा., मुंबई.
कार्यासन अधिकारी, का. क्र. २२/२३/२४ /३६ व ए.पी.ए.शाखा.